‘मुगले-आझम’ ची पन्नाशी

अलिकडंच कपाटाची साफ सफाई करताना एका मित्रानं मुद्दाम पाठवलेली डी.व्ही.डी.सापडली.‘थ्री इन वन’ म्हणजे तीन बोलपट एकीत साठवलेली.‘अनारकली’(१९५३), ‘मुगले आझम’(१९६0) व ‘ताज महल’(१९६३).अशी तबकडी बनवणा-याच्या योजकतेचं कौतुक वाटलं.पैकी दोन बोलपट एकाच विषयावरचे.अनारकलीला नाहीशी करणारे पण वेगवेगळा शेवट असलेले.कपोल कल्पित व असफल प्रेमकहाणीवर आधारित.तिसरा मात्र त्याच घराण्यातल्या सलीमच्या मुलाच्या, म्हणजे बादशहा शाहजहान व बेगम मुमताजच्या खरंच घडून गेलेल्या प्रेमकहाणीचा.आजही त्या प्रेमाची खूण ‘ताज महल’च्या रूपानं जिवंत असलेला.ही डी.व्ही.डी.आल्यापासून बघायची राहूनच गेली होती.निवांत असा रविवार असल्यानं ‘लॅपटॉप’ मध्ये तबकडी सरकवली.कानात हेडफोनच्या गुंडया घातल्या.‘मुगले आझम’नंच सुरूवात केली.सेन्सॉर बोर्डानं दिलेलं सर्टिफिकेट लॅपटॉपच्या चिमुकल्या स्क्रीनवर थरथरायला लागलं.लांबी पाच हजार मीटर, फिल्मची रिळं वीस.कालावधी तीन तास व वीस मिनिटं.हे सर्टिफिकेट ‘जारी करनेकी तारीख’ एप्रिल एकोणीसशे साठमधली.‘विकीपीडिया’ प्रमाणे प्रिमियर व प्रकाशन ५ ऑगष्ट २0१0 चं.म्हणजे हया वर्षीच्या ऑगष्ट मध्ये हा बोलपट पन्नाशी ओलांडणार तर!

संगणकाच्या पडद्यावर फिल्म उलगडत चालली होती खरी, पण मनात वेगळेच विचार सुरू झाले होते.अगदी पहिल्यांदा केव्हां बरं बघितली

होती? शाळेत असताना? गणेश उत्सवात रात्री रस्त्यावर बसून तुकडया तुकडयानं बघितल्याचं काहीसं अंधुकसं आठवायला लागलं. आजूबाजूच्या गल्ल्यांतूनही सिंगल प्रोजेक्टरवर तोच खेळ मागेपुढं असल्यानं फिल्मचे डबे इकडून तिकडे वाहून नेण्यात गणेशोत्सव मंडळांच्या कार्यकर्त्यांची धावपळ असायची. त्यामुळं दोन रिळांमध्ये मोठं मध्यंतरही असायचं. पण त्याचं कुणालाच काही वाटायचं नाही. अव्वल उर्दू भाषेतले पण पार डोक्यावरून जाणारे संवाद. अकबर बादशहाचा खर्जातला आवाज व 'शेखू' अशी हाक देत राजपुत्र सलीमशी होणारं भाषण. पात्रं आपापसात बोलतानाही सुरूवात करतांना वारंवार येणा-या पदव्या : 'जिल्लेइलाही', 'जनाबेआली', 'जहाँपनाह', 'साहिबेआलम', 'मलिका-ए-हिंदुस्थान' इ. दरबारात शाही स्वा-यांच्या येण्याजाण्याच्या वेळी दिल्या जाणा-या पल्लेदार ललका-या. निरोप देताना येणारा 'तखलियत' सारखा भारी वजनदार शब्द. हे सगळं त्या लहान वयात एकूणात भारीच पडायचं. पण गाणी व नाच सुरू झाले की या सगळयाची पुरेपूर भरपाई व्हायची.

पुढं महा व विश्वविद्यालयात शिकत असताना तासांना दांडया मारून 'मुगले आझम' व त्या कुळातले बोलपट सवंगडयांबरोबर 'मॅटिनी'ला 'टाकणं' ही मोठीच चैन असायची. त्यावेळी दिलीपकुमार व मधुबाला हे काय प्रकरण आहे हे चांगलंच उमगायला लागलं होतं. रिपीट रनला असल्यानं प्रिंट गचाळ असायची. चरे व ओरखडयांमुळं पडद्यावर पाऊस पडल्यासारखे सीन दिसायचे. पण 'प्यार किया तो डरना क्या' सुरू झालं की ते सगळं विसरायला व्हायचं. काही विद्वान दोस्त मंडळी

डायलॉगबाजी सुरू झाली की बाहेर जाऊन चहा पिऊन व धूर वगैरे काढून गाण्याच्या वेळी नेमकी बरोबर आत येऊन बसायची.

काळाच्या ओघात हे दिवसही सरले. मुलाबाळांसह 'मुगले आझम' बघायचे दिवस आले. घरोघरी छोटा पडदा, मायबाप सरकारची एकुलती एक वाहिनी, तिच्यावरची छायागीतं व विशेष प्रसंगी व अनेकदा रविवारी दुपारी जुने क्लासिक बोलपट दाखवत. उंचावर किंवा इमारतीच्या गच्चीवर प्रत्येक संचासाठी भली मोठी 'यागी अँटेना' बसवावी लागे. तेव्हा पुन्हा एकदा 'मुगले आझम' बघितल्याची आठवण स्वच्छ आहे. आजूबाजूला अनेक ऊंच इमारती असल्याने एकावेळी अनेक प्रतिमा दिसत. अनेक दिलीपकुमार व मधुबाला 'प्रेम जोबन बन' च्या पार्श्वभूमीवर प्रणय करताना दिसत. पण अगदी बघवत नसत. बरं जमाना 'कृष्ण धवल' चा असल्यानं रंगीत दृष्यं पण काळी पांढरी पहायला लागायची. ऊठसूठ जाहीराती नसायच्या हे खरं. पण घरात बसून सिनेमा बघायची छान सोय होती. अर्थात दूरदर्शन दाखवेल तोच व तेव्हांच.

ऐंशीच्या दरम्यान दिल्लीला 'एशियाड' होऊन गेलं. तिथं वापरलेल्या बसगाडया कालांतरानं आपल्या रस्त्यांवर त्याच नावानं वाहतूक करू लागल्या. हयाचा एक मोठा फायदा म्हणजे रंगीत दूरदर्शनचं आगमन. तसंच व्हिडियो टेप व प्लेयर्समुळं सिनेमा वस्तीत, घरात व हातात आला. चाळी चाळीतनं सत्यनारायण किंवा गणेशोत्सवाला लोक वर्गणी काढून हवी ती टेप भाडयानं आणून हवी तेवढी करमणूक करून घेऊ लागले. दरम्यान 'मुगले आझम' बद्दलची जाण

ही वाढतच होती. म्हणजे दीडेक कोटी रूपये खर्च करून हा सिनेमा के. असीफ नावाच्या अवलियानं बनवलाय. मधुबाला नाच करतात त्या प्रकाराला ‘कथ्थक’ असं म्हणतात व ते लच्छू महाराजांनी त्यांच्याकडून बसवून घेतलं होतं. सलीम-अनारकलीच्या प्रणय प्रसंगाच्या पार्श्वभूमीवर ‘सोहोनी’ नावाचा राग ऐकायला येतोय व त्याचं गायन उ. बडे गुलाम अली खान हयांनी पंचवीस हजार रूपये बिदागी घेऊन केलंय. यातलं एकच गाणं रफींच्या आवाजातलं असून बाकीची सगळी लता मंगेशकरांनी गायिली आहेत. एका गाण्यात सहगायिका शमशाद बेगम आहेत. नौशादांनी यमन, दरबारी, केदार, गारा, रागेश्वरी, मेघ व जयजयवंती असे राग घेऊन हयातली गाणी केली आहेत. वगैरे.

नव्वदच्या दशकात उपग्रह वाहिन्या आल्या. पाहता पाहता शतक समाप्ती पर्यंत गणकयंत्रांच्या ‘आठवणीच्या’ (मेमरी) व ‘साठवणीच्या’ (स्टोअरेज) क्षमतेत, किंमतीत, आकारात व प्रकारांत प्रचंड उलथापालथ झाली. व्हिडियो टेप व प्लेयर्स भंगारात गेले. मध्यंतरी ताटाएवढी लेझर डिस्क येऊन केव्हा गायब झाली ते कळलंही नाही. तिची जागा तळहातावर मावणा-या कॉम्पॅक्ट डिस्क म्हणजे सी. डी. नं घेतली. आधी व्ही. सी. डी. वर व आता डी. व्ही. डी. वर उत्तम प्रतीचे बोलपट नगण्य किंमतीला मिळायला लागले. हवे तेव्हा मागं पुढं करून पहायची सोय झाली.

दरम्यान खंडीभर वाहिन्या अहोरात्र मनोरंजनाचे रतीब घालू लागल्या. त्यातल्या काही तर चोवीस तास सिनेमाच दाखवण्याच्या

कामाला वाहून घेतलेल्या निघाल्या. मग काय. तेच तेच चित्रपट पुन्हा पुन्हा पहायला मिळू लागले. ते कसे बघावेत याचंही प्रबोधन जाणकार मंडळी करू लागली. हा शतक समाप्तीचा काळ होता. 'मुगले आझम' सिनेमाशी संबंधित बरंच लिखाण प्रिंट व इलेक्ट्रॉनिक माध्यमातून प्रसिद्ध व्हायला लागलं होतं. त्यातनं बरीच जुनी माहिती नव्यानं मिळत होती. संपूर्ण उत्तर हिंदुस्थानात रौप्य व सुवर्ण महोत्सवाच्याही पुढं जाऊन सिनेमा चांगला दीडेक वर्ष हाऊसफुल्ल गेला होता. गुजराथी निर्माते पितापुत्र शापूरजी व पालनजींनी गुंतवलेले पैसे दामदुपटीनं वसूल झाले होते. दक्षिणेकडे 'अकबर' नावानं तामिळ भाषेत डब झाला. पण सपशेल आपटला. मात्र पी. सुशीलानं गायिलेला 'मुहब्बत की झूठी कहानी पे रोये' चा दरबारी रागातला तामिळ अवतार आजही अत्यंत लोकप्रिय आहे. जातिवंत संग्राहकांच्या खजिन्यात तो अर्थातच उपलब्ध आहे. साहेब लोकांसाठी इंग्रजीमध्येही डब झाला म्हणे. पण त्याची प्रिंट गायब आहे. १९६0 चे सर्वोत्तम बोलपट, संवाद लेखन व छायाचित्रणाचे तीन 'फिल्मफेअर' पुरस्कार मिळाले. मात्र संगीताचा हुकला. तो 'दिल अपना और प्रीत परायी' ला मिळाला. त्यावर भाष्य करताना फिल्मफेअरचे त्यावेळचे संपादक म्हणाले, 'मुगले आझम' इल्मी (इंटेलेक्टयुअल) आहे तर 'दिल अपना' फिल्मी आहे'.

अश्या हया 'इल्मी' सिनेमाचं गारूड अद्याप कायम आहे. २00४ साली प्रत्येक फ्रेम रंगवून हा बोलपट थिएटरात प्रदर्शित झाला. उत्तम सिंग व नौशादांच्या मुलानं त्याच्या संगीताला आधुनिक स्वरमेळ पुरवला. लांबी अडीच तासाइतकी कमी करण्यात आली. तो पूर्वी

इतका धो धो नाही चालला. रंगसंगतीवर टीका पण झाली. पण अश्या प्रकारचा हा जगातला पहिलाच बोलपट ठरला. २००५ मध्ये तामिळ प्रिंट पण रंगवून 'अनारकली' नावानं दक्षिणेत वितरित करण्याकरिता सिद्ध केली. पण आपटली. जगभरातल्याच प्रेक्षकांना उर्दू भाषा समजण्यात येणा-या अडचणींची कल्पना असल्यानं हया रंगीत बोलपटांच्या इंग्रजी सब टायटल्स असलेल्या प्रती पण बनवल्या. किंमती पण माफक असल्याने शौकिनांच्या व्यक्तिगत संग्रहात जाऊन बसल्या. पायरेटेड प्रतीही फूटपाथवर आल्या.

पाचेक वर्षांपूर्वी 'यू टयूब' नावाचा नवा जादुई दिवा 'नेटिझन्स'ना उपलब्ध झाला. कॉपीराईट कायद्याच्या चिंधडया उडवत जगभरातल्या सान थोरांनी त्यावर व्हिडियो व गाणी टाकायचा सपाटाच लावला. त्यात 'मुगले आझम' च्या भक्तांनी अनेक क्लिप्स टाकल्या आहेत. सगळी काळी पांढरी व रंगीत गाणी अगदी सब टायटल्ससह किंवा शिवायही पहायला व ऐकायला मिळतातच, पण 'चकटफू' तिथल्या तिथं क्षणार्धात आपल्या हार्ड डिस्क वर डाऊनलोड करून घ्यायची पण मोठीच सोय आहे. रंगीत आवृत्ती तर काही भागांमध्ये विभागून भरण्यात आली आहे. मूळ सिनेमा ३५ मि. मि. चा चौरस आकाराचा. इथं मात्र भक्तांनी आपल्याला हवा तसा म्हणजे सिनेमास्कोप, वाईडस्क्रीन मापांत टाकलाय. शिवाय काही विशेष व दुर्मिळ व्हिडियो पण आहेत. दोन रिळांचा 'मुगले आझम'च्या प्रिमियरचा सोहोळा त्यात पाहता येतो. हा सोहोळा ब्लॅक अँड व्हाईट असून त्यात दिग्दर्शक के. असीफ पहायला मिळतात. त्याचं दिग्दर्शन ओ. पी. रल्हन यांचं असून तो १९७२ साली प्रदर्शित झाल्याचं

सेन्सॉरच्या सर्टिफिकेट वरून समजतं.फार पूर्वी ‘नूरजहां’ नं काम केलेला व पाकिस्तानात बनलेला ‘अनारकली’ हा एक बोलपट तिकडं होऊन गेला.त्याचं संगीत रशीद अत्रे हयांचं होतं.तो अनेक भागात विखरून टाकलेला आहे.त्याखाली ‘नेटिझनां’ची चर्चापण आहे.काही जणांना ‘मधुबाला’ पुरूषी वाटते व तिला नाचता येत नाही असं ते म्हणतात.नूरजहाँच खरी खुरी अनारकली असं मतही काही जण मांडतात.आणखी दोन व्हिडियोत ‘प्यार किया तो डरना क्या’ गाण्यातल्या प्रसंगावर दुसरीच गाणी भरून आगळं रिमिक्स केलं आहे.त्यातलं एक हिंदी तर दुसरं चक्क तामिळ भाषेतलं आहे.खरं पाहिलं तर ‘मुगले आझम’ हया बोलपटाचा ल.सा.वि.(लघुत्तम साधारण विभाजक) ‘प्यार किया तो डरना क्या’ हे अपूर्व गाणं, सशक्त प्रेमकहाणी व अनारकलीच्या भूमिकेतली सौंदर्यखनी मधुबाला हेच आहेत.त्यामुळेच अवधूत गुप्ते ते मल्लिका शेरावत पर्यंतची सगळी तरूणाई हयांच्या आकंठ प्रेमात बुडालेली आहेत.‘प्यार किया तो डरना क्या’ हे मराठी नाटक व ‘मान गये मुगले आझम’ हा हिंदी विडंबनपट ही त्याची अगदी अलिकडची उदाहरणं.शेवटी ज्याच्यावर मनापासून व उत्कट प्रेम असतं त्याचीच टवाळी व विडंबन होतं व ते क्षम्यही असतं.खरं ना?

‘मुगले आझम’ माझ्या लॅपटॉपवर मला हवा तेव्हा व हवा तसा मागेपुढं करून एकटयानंच बघत असताना हा सगळा इतिहास डोळयांसमोरून जात होता.त्याच तबकडीवर तुलनेसाठी व अभ्यासा करिता ‘अनारकली’ व ‘ताज महल’ ही उपलब्ध आहेत.त्यात तर प्रदीपकुमार व बीना रॉय प्रमुख भूमिकांत.मध्ये फक्त दहा वर्षं निघून

गेली आहेत. आज 'मुगले आझम' शी संबंधित बहुतेक सगळी मंडळी कालवश झाली आहेत. फक्त सलीमच्या भूमिकेतले अभिनेते दिलीपकुमार व गायन सम्राज्ञी लता मंगेशकर हे दोघेच हयात असून हया सर्व बदलांचे ते महत्वाचे साक्षीदार आहेत.

डॉ. सुरेश चांदवणकर, नेव्हीनगर, कुलाबा मुंबई
१४ जुलै २०१०. chandvankar.suresh@gmail.com